.. Dnyaneshvari or Bhavarthadipika Chapter 2 ..

॥ ज्ञानेश्वरी भावार्थदीपिका अध्याय २ ॥

॥ ॐ श्री परमात्मने नमः ॥
अध्याय दुसरा ।
साङ्ख्ययोगः ।

संजय उवाच ।
तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १॥

मग संजयो म्हणे रायातें। आईकें तो पार्थु तेथें। शोकाकुल रुदनातें। करितु असे ॥ १॥
तें कुळ देखोनि समस्त। स्नेह उपनलें अद्‌भुत। तेणें द्रवलें असे चित्त। कवणेपरी ॥ २॥
जैसें लवण जळें झळंबलें। ना तरी अभ्र वातें हाले। तैसें सधीर परी विरमलें। हृदय तयाचें ॥ ३॥
म्हणौनि कृपा आकळिला। दिसतसे अति कोमाइला। जैसा कर्दमीं रुपला। राजहंस ॥ ४॥
तयापरी तो पांडुकुमरु। महामोहें अति जर्जरु। देखोनि श्रीशारङ्गधरु। काय बोले ॥ ५॥

श्रीभगवानुवाच ।
कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २॥

म्हणे अर्जुना आदि पाहीं। हें उचित काय इये ठायीं। तूं कवण हें कायी। करीत आहासी ॥ ६॥
तुज सांगे काय जाहलें। कवण उणें आलें। करितां काय ठेलें। खेदु कायिसा ॥ ७॥
तूं अनुचिता चित्त नेदिसी। धीरु कहीं न संडिसी। तुझेनि नामें अपयशी। दिशा लंघिजे ॥ ८॥
तूं शूरवृत्तीचा ठावो। क्षत्रियांमाजीं रावो। तुझिया लाठेपणाचा आवो। तिहीं लोकीं ॥ ९॥
तुवां संग्रामीं हरु जिंकिला। निवातकवचांचा ठावो फेडिला। पवाडा तुवां केला। गंधर्वांसीं ॥ १०॥
पाहतां तुझेनि पाडें। दिसे त्रैलोक्यही थोकडें। ऐसें पुरुषत्व चोखडें। पार्था तुझें ॥ ११॥
तो तूं कीं आजि एथें। सांडूनियां वीरवृत्तीतें। अधोमुख रुदनातें। करितु आहासी ॥ १२॥
विचारीं तूं अर्जुनु। कीं कारुण्यें किजसी दीनु। सांग पां अंधकारें भानु। ग्रासिला आथी ? ॥ १३॥
ना तरी पवनु मेघासी बिहे ?। कीं अमृतासी मरण आहे ?। पाहें पां इंधनचि गिळोनि जाये। पावकातें ? ॥ १४॥
कीं लवणेंचि जळ विरे ?। संसर्गें काळकूट मरे ?। सांग पां महाफणी दर्दुरें। गिळिजे कायी ? ॥ १५॥
सिंहासी झोंबे कोल्हा। ऐसा अपाडु आथि कें जाहला ?। परी तो त्वां साच केला। आजि एथ ॥ १६॥
म्हणौनि अझुनी अर्जुना। झणें चित्त देसी या हीना। वेगीं धीर करूनियां मना। सावधु होई ॥ १७॥
सांडीं हें मूर्खपण। उठीं घे धनुष्यबाण। संग्रामीं हें कवण। कारुण्य तुझें ? ॥ १८॥
हां गा तूं जाणता। तरी न विचारिसी कां आतां। सांगें झुंजावेळे सदयता। उचित कायी ? ॥ १९॥

हे असतीये कीर्तीसी नाशु। आणि पारत्रिकासी अपभ्रंशु। म्हणे जगन्निवासु। अर्जुनातें ॥ २०॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३॥

म्हणौनि शोकु न करी। तूं पुरता धीरु धरीं। हें शोच्यता अव्हेरीं। पंडुकुमरा ॥ २१॥
तुज नव्हे हें उचित। येणें नासेल जोडलें बहुत। तूं अझुनी वरी हित। विचारीं पां ॥ २२॥
येणें संग्रामाचेनि अवसरें। एथ कृपाळूपण नुपकरे। हे आतांचि काय सोयरे। जाहले तुज ? ॥ २३॥
तूं आधींचि काय नेणसी ?। कीं हे गोत्रज नोळखसी ?। वायांचि काय करिसी। अतिशो आतां ? ॥ २४॥
आजिचें हें झुंज। काय जन्मा नवल तुज ?। हें परस्परें तुम्हां व्याज। सदांचि आथी ॥ २५॥
तरी आतां काय जाहलें। कायि स्नेह उपनलें। हें नेणिजे परी कुडें केलें। अर्जुना तुवां ॥ २६॥
मोहो धरिलीया ऐसें होईल। जे असती प्रतिष्ठा जाईल। आणि परलोकही अंतरेल। ऐहिकेंसी ॥ २७॥
हृदयाचें ढिलेपण। एथ निकयासी नव्हे कारण। हें संग्रामीं पतन जाण। क्षत्रियांसीं ॥ २८॥
ऐसेनि तो कृपावंतु। नानापरी असे शिकवितु। हें ऐकोनि पंडुसुतु। काय बोले ॥ २९॥

अर्जुन उवाच ।
कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।
इषुभिः प्रति योत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४॥

देवा हें येतुलेवरी। बोलावें नलगे अवधारीं। आधीं तूंचि विचारीं। संग्रामु हा ॥ ३०॥
हें झुंज नव्हे प्रमादु। एथ प्रवर्तलिया दिसतसे बाधु। हा उघड लिंगभेदु। वोढवला आम्हां ॥ ३१॥
देखें मातापितरें अर्चिजती। सर्वस्वें तोषु पावविजती। तिये पाठीं केवीं वधिजती। आपुलिया हातीं ॥ ३२॥
देवा संतवृंद नमस्कारिजे। कां घडे तरी पूजिजे। हें वांचूनि केवीं निंदिजे। स्वयें वाचा ? ॥ ३३॥
तैसे गोत्रगुरु आमुचे। हे पूजनीय आम्हां नियमाचे। मज बहुत भीष्मद्रोणांचें। वर्ततसे ॥ ३४॥
जयांलागीं मनें विरूं। आम्ही स्वप्नींही न शकों धरूं। तयां प्रत्यक्ष केवीं करूं। घातु देवा ? ॥ ३५॥
वरी जळो हें जियालें। एथ आघवेयांसि हेंचि काय जाहले। जे यांच्या वधीं अभ्यासिले। मिरविजे आम्हीं ॥ ३६॥
मी पार्थु द्रोणाचा केला। येणें धनुर्वेदु मज दिधला। तेणें उपकारें काय आभारैला। वधी तयातें ? ॥ ३७॥
जेथींचिया कृपा लाहिजे वरु। तेथेंचि मनें व्यभिचारु। तरी काय मी भस्मासुरु। अर्जुन म्हणे ॥ ३८॥

गुरुनहत्वा हि महानुभावान् श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुञ्जीय भोगान्रुधिरप्रदिग्धान् ॥ ५॥

देवा समुद्र गंभीर आइकिजे। वरि तोहि आहाच देखिजे। परी क्षोभु मनीं नेणिजे। द्रोणाचिये ॥ ३९॥
हें अपार जें गगन। वरी तयाही होईल मान। परि अगाध भलें गहन। हृदय याचें ॥ ४०॥
वरी अमृतही विटे। कीं काळवशें वज्रही फुटे। परी मनोधर्मु न लोटे। विकरविलाही ॥ ४१॥
स्नेहालागीं माये। म्हणिपे तें कीरु होये। परी कृपा ते मूर्त आहे। द्रोणीं इये ॥ ४२॥

हा कारुण्याची आदि। सकल गुणांचा निधि। विद्यासिंधु निरवधि। अर्जुन म्हणे ॥ ४३॥
हा येणें मानें महंतु। वरी आम्हांलागीं कृपावंतु। आतां सांग पां येथ घातु। चिंतूं येईल ॥ ४४॥
ऐसे हे रणीं वधावे। मग आपण राज्यसुख भोगावें। तें मना न ये आघवें। जीवितेसीं ॥ ४५॥
हें येणें मानें दुर्धर। जे याहीहुनी भोग सधर। ते असतु येथवर। भिक्षा मागतां भली ॥ ४६॥
ना तरी देशत्यागें जाइजे। कां गिरिकंदर सेविजे। परी शस्त्र आतां न धरिजे। इयांवरी ॥ ४७॥
देवा नवनिशतीं शरीं। वावरोनी यांच्या जिव्हारीं। भोग गिंवसावे रुधिरीं। बुडाले जे ॥ ४८॥
ते काढूनि काय किजती ?। लिप्त केवी सेविजती ?। मज नये हे उपपत्ती। याचिलागीं ॥ ४९॥
ऐसें अर्जुन तिये अवसरी। म्हणे श्रीकृष्णा अवधारीं। परी तें मना नयेचि मुरारी। आइकोनियां ॥ ५०॥
हें जाणोनि पार्थु बिहाला। मग पुनरपि बोलों लागला। म्हणे देवो कां चित्त या बोला। देतीचिना ॥ ५१॥

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।
यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६॥

येऱ्हवीं माझ्या चित्तीं जें होतें। तें मी विचारूनि बोलिलों एथें। परी निकें काय यापरौतें। तें तुम्हीं जाणा ॥ ५२॥
पैं वीरु जयांसी ऐकिजे। आणि या बोलींचि प्राणु सांडिजे। ते एथ संग्रामव्याजें। उभे आहाती ॥ ५३॥
आतां ऐसियांतें वधावें। कीं अव्हेरूनियां निघावें। या दोहींमाजीं बरवें। तें नेणों आम्ही ॥ ५४॥

कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेताः ।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ ७॥

आम्हां काय उचित। तें पाहतां न स्फुरे एथ। जें मोहें येणें चित्त। व्याकुळ माझें ॥ ५५॥
तिमिरावरुद्ध जैसें। दृष्टीचें तेज भ्रंशे। मग पासींच असतां न दिसे। वस्तुजात ॥ ५६॥
देवा तैसें मज जाहलें। जें मन हें भ्रांती ग्रासिलें। आतां काय हित आपुलें। तेंही नेणें ॥ ५७॥
तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें। निकें तें आम्हां सांगावें। जे सखा सर्वस्व आघवें। आम्हांसि तूं ॥ ५८॥
तूं गुरु बंधु पिता। तूं आमुची इष्ट देवता। तूंचि सदा रक्षिता। आपदीं आमुतें ॥ ५९॥
जैसा शिष्यांतें गुरु। सर्वथा नेणें अव्हेरु। कीं सरितांतें सागरु। त्यजीं केवी ॥ ६०॥
नातरी अपत्यांतें माये। सांडूनि जरी जाये। तरी तें कैसेंनि जिये। ऐकें कृष्णा ॥ ६१॥
तैसा सर्वांपरी आम्हांसी। देवा तूंचि एक आहासी। आणि बोलिलें जरी न मानिसी। मागील माझें ॥ ६२॥
तरी उचित काय आम्हां। जें व्यभिचरेना धर्मा। तें झडकरी पुरुषोत्तमा। सांगें आतां ॥ ६३॥

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्यच्छोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥ ८॥

हें सकळ कुळ देखोनि। जो शोकु उपनलासे मनीं। तो तुझिया वाक्यावांचुनी। न जाय आणिकें ॥ ६४॥
एथ पृथ्वीतळ आपु होईल। हें महेंद्रपदही पाविजेल। परी मोह हा न फिटेल। मानसींचा ॥ ६५॥
जैसीं बीजें सर्वथा आहाळलीं। तीं सुक्षेत्रीं जऱ्ही पेरिलीं। तरी न विरूढती सिंचिलीं। आवडे तैसीं ॥ ६६॥

ना तरी आयुष्य पुरलें आहे। तरी औषधें कांहीं नोहे। एथ एकचि उपेगा जाये। परमामृत ॥ ६७॥
तैसे राज्यभोगसमृद्धि। उज्जीवन नोहे जीव बुद्धि। एथ जिव्हाळा कृपानिधि। कारुण्य तुझें ॥ ६८॥
ऐसें अर्जुन तेथ बोलिला। जंव क्षण एक भ्रांति सांडिला। मग पुनरपि व्यापिला। उर्मी तेणें ॥ ६९॥
कीं मज पाहतां उर्मी नोहे। हें अनारिसें गमत आहे। तो ग्रासिला महामोहें। काळसर्पें ॥ ७०॥
सवर्म हृदयकल्हारीं। तेथ कारुण्यवेळेच्या भरीं। लागला म्हणोनि लहरी। भांजेचिना ? ॥ ७१॥
हें जाणोनि ऐसी प्रौढी। जो दृष्टीसवेंचि विष फेडी। तो धांवया श्रीहरी गारुडी। पातला कीं ॥ ७२॥
तैसिया पंडुकुमरा व्याकुळा। मिरवतसे श्रीकृष्ण जवळा। तो कृपावशें अवलीळा। रक्षील आतां ॥ ७३॥
म्हणोनि तो पार्थु। मोहफणिग्रस्तु। म्यां म्हणितला हा हेतु। जाणोनियां ॥ ७४॥
मग देखा तेथ फाल्गुनु। घेतला असे भ्रांती कवळूनु। जैसा घनपटळीं भानु। आच्छादिजे ॥ ७५॥
तयापरी तो धनुर्धरु। जाहलासे दुःखें जर्जरु। जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवरु। वणवला कां ॥ ७६॥
म्हणोनि सहजें सुनीळु। कृपामृतें सजळु। तो वोळलासे श्रीगोपाळु। महामेघु ॥ ७७॥
तेथ सुदशनांची द्युति। तेचि विद्युल्लता झळकती। गंभीर वाचा ते आयती। गर्जनेची ॥ ७८॥
आतां तो उदार कैसा वर्षेल। तेणें अर्जुनाचळु निवेल। मग नवी विरूढी फुटेल। उन्मेषाची ॥ ७९॥
ते कथा आइका। मनाचिया आराणुका। ज्ञानदेवो म्हणे देखा। निवृत्तिदासु ॥ ८०॥

संजय उवाच ।
एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।
न योत्स्य इति गोविंमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥ ९॥

ऐसें संजयो असे सांगतु। म्हणे राया तो पार्थु। पुनरपि शोकाकुळितु। काय बोले ॥ ८१॥
आइके सखेदु बोले श्रीकृष्णातें। आतां नाळवावें तुम्हीं मातें। मी सर्वथा न झुंजें एथें। भरंवसेनी ॥ ८२॥
ऐसें येकि हेळां बोलिला। मग मौन धरूनि ठेला। तेथ श्रीकृष्णा विस्मो पातला। देखोनि तयातें ॥ ८३॥

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।
सेनयोरूभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः ॥ १०॥

मग आपुलां चित्तीं म्हणे। एथ हें कायी आदरिलें येणें। अर्जुन सर्वथा कांहीं नेणें। काय कीजे ॥ ८४॥
हा उमजे आतां कवणेपरी। कैसेनि धीरू स्वीकारी। जैसा ग्रहातें पंचाक्षरी। अनुमानी कां ॥ ८५॥
ना तरी असाध्य देखोनि व्याधि। अमृतासम दिव्य औषधि। वैद्य सूचि निरवधि। निदानीची ॥ ८६॥
तैसे विवरीतु असे श्रीअनंतु। तया दोन्ही सैन्याआंतु। जयापरी पार्थु। भ्रांती सांडी ॥ ८७॥
तें कारण मनीं धरिलें। मग सरोष बोलों आदरिलें। जैसे मातेच्या कोपीं थोकुलें। स्नेह आथी ॥ ८८॥
कीं औषधाचिया कडुवटपणीं। जैसी अमृताची पुरवणीं। ते आहाच न दिसे परी गुणीं। प्रकट होय ॥ ८९॥
तैसीं वरिवरी पाहतां उदासें। आंत तरी अतिसुरसें। तियें वाक्यें हृषीकेशें। बोलों आदरिलीं ॥ ९०॥

श्रीभगवानुवाच ।
अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।

गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः ॥११॥

मग अर्जुनातें म्हणितलें। आम्हीं आजि हें नवल देखिलें। जें तुवां एथ आदरिलें। माझारींचि ॥९१॥
तूं जाणता तरी म्हणविसी। परी नेणिवेतें न संडिसी। आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी। बहुसाल नीति ॥९२॥
जात्यंधा लागे पिसें। मग तें सैरा धांवे जैसें। तुझे शहाणपण तैसें। दिसतसे ॥९३॥
तूं आपणपें तरी नेणसी। परी या कौरवांतें शोचूं पहासी। हा बहु विस्मय आम्हांसी। पुढतपुढती ॥९४॥
तरी सांग पां अर्जुना। तुजपासूनि स्थिति या त्रिभुवना ?। हे अनादि विश्वरचना। तें लटके कायी ? ॥९५॥
एथ समर्थु एक आथी। तयापासूनि भूतें होती। तरी हें वायांचि काय बोलती। जगामाजीं ? ॥९६॥
हो कां सांप्रत ऐसें जाहलें। जे हे जन्ममृत्यु तुवां सृजिलें। आणि नाशु पावे नाशिलें। तुझेनि कायी ॥९७॥
तूं भ्रमलेपणें अहंकृती। यांसि घातु न धरिसी चित्तीं। तरी सांगें कायि हे होती। चिरंतन ॥९८॥
कीं तूं एक वधिता। आणि सकळ लोकु हा मरता। ऐसी भ्रांति झणें चित्ता। येवों देसी ॥९९॥
अनादिसिद्ध हें आघवें। होत जात स्वभावें। तरी तुवां कां शोचावें। सांगें मज ॥१००॥
परी मूर्खपणें नेणसी। न चिंतावें तें चिंतीसी। आणि तूंचि नीति सांगसी। आम्हांप्रति ॥१०१॥
देखैं विवेकी जे होती। ते दोहीतेंहीं न शोचिती। जे होय जाय हे भ्रांती। म्हणौनियां ॥१०२॥

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ।
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥१२॥

अर्जुना सांगेन आइक। एथ आम्ही तुम्ही देख। आणि हे भूपति अशेख। आदिकरुनी ॥१०३॥
नित्यता ऐसेचि असोनी। ना तरी निश्चित क्षया जाउनी। हे भ्रांति वेगळी करुनी। दोन्ही नाहीं ॥१०४॥
हे उपजे आणि नाशे। तें मायावशें दिसे। एऱ्हवीं तत्त्वता वस्तु जें असे। तें अविनाशचि ॥१०५॥
जैसें पवनें तोय हालविलें। आणि तरंगाकार जाहलें। तरी कवण कें जन्मलें। म्हणों ये तेथ ? ॥१०६॥
तेंचि वायूचें स्फुरण ठेलें। आणि उदक सहज सपाट जाहलें। तरी आतां काय निमालें। विचारीं पां ॥१०७॥

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥१३॥

आइकें शरीर तरी एक। परी वयसा भेद अनेक। हें प्रत्यक्षचि देख। प्रमाण तूं ॥१०८॥
एथ कौमारत्व दिसे। मग तारुण्यीं तें भ्रंशे। परी देहचि हा न नाशे। एकेकासवें ॥१०९॥
तैसीं चैतन्याच्या ठायीं। इयें शरीरांतरें होती जाती पाहीं। ऐसें जाणे तया नाहीं। व्यामोहदुःख ॥११०॥

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदा ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥१४॥

एथ कौमारत्व दिसे। मग तारुण्यीं तें भ्रंशे। परी देहचि हा न नाशे। एकेकासवें ॥१०९॥
तैसीं चैतन्याच्या ठायीं। इयें शरीरांतरें होती जाती पाहीं। ऐसें जाणे तया नाहीं। व्यामोहदुःख ॥११०॥

एथ नेणावया हेंचि कारण। जें इंद्रियां आधीनपण। तिहीं आकळिजे अंतःकरण। म्हणऊनि भ्रमे ॥ १११ ॥
इंद्रियें विषय सेविती। तेथ हर्ष शोक उपजती। ते अंतर आप्लविती। संगें येणें ॥ ११२ ॥
जयां विषयांच्या ठायीं। एकनिष्ठता कहीं नाहीं। तेथ दुःख आणि कांहीं। सुखही दिसे ॥ ११३ ॥
देखें शब्दाचि व्याप्ति। निंदा आणि स्तुति। तेथ द्वेषाद्वेष उपजती। श्रवणद्वारें ॥ ११४ ॥
मृदु आणि कठीण। हे स्पर्शाचे दोन्ही गुण। जे वपूचेनि संगें कारण। संतोषखेदां ॥ ११५ ॥
भ्यासुर आणि सुरेख। हें रूपाचें स्वरूप देख। जें उपजवी सुखदुःख। नेत्रद्वारें ॥ ११६ ॥
सुगंधु आणि दुर्गंधु। हा परिमळाचा भेदु। जो घ्राणसंगें विषादु। तोषु देता ॥ ११७ ॥
तैसाचि द्विविध रसु। उपजवी प्रीति त्रासु। म्हणौनि हा अपभ्रंशु। विषयसंगु ॥ ११८ ॥
देखें इंद्रियां आधीन होईजे। तैं शीतोष्णांतें पाविजे। आणि सुखदुःखीं आकळिजे। आपणपें ॥ ११९ ॥
या विषयांवांचूनि कांहीं। आणीक सर्वथा रम्य नाहीं। ऐसा स्वभावोचि पाहीं। इंद्रियांचा ॥ १२० ॥
हे विषय तरी कैसे। रोहिणीचें जळ जैसें। कां स्वप्नींचा आभासे। भद्रजाति ॥ १२१ ॥
देखैं अनित्य तियापरी। म्हणौनि तूं अव्हेरीं। हा सर्वथा संगु न धरीं। धनुर्धरा ॥ १२२ ॥

यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ ।
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥

हे विषय जयातें नाकळिती। तया सुखदुःखें दोनी न पवती। आणि गर्भवासुसंगती। नाहीं तया ॥ १२३ ॥
तो नित्यरूप पार्था। वोळखावा सर्वथा। जो या इंद्रियार्था। नागवेचि ॥ १२४ ॥

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥

आतां अर्जुना कांहीं एक। सांगेन मी आईक। जे विचारपर लोक। वोळखिती ॥ १२५ ॥
या उपाधिमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत। तें तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती ॥ १२६ ॥
सलिलीं पय जैसें। एक होऊनि मीनलें असे। परी निवडूनि राजहंसें। वेगळें कीजे ॥ १२७ ॥
कीं अग्निमुखें किडाळ। तोडोनियां चोखाळ। निवडिती केवळ। बुद्धिमंत ॥ १२८ ॥
ना तरी जाणिवेच्या आयणी। करितां दधिकडसणी। मग नवनीत निर्वाणीं। दिसे जैसें ॥ १२९ ॥
कीं भूस बीज एकवट। उपणितां राहे घनवट। तेथ उडे तें फलकट। जाणों आलें ॥ १३० ॥
तैसें विचारितां निरसलें। तें प्रपंचु सहजें सांडवलें। मग तत्त्वता तत्त्व उरलें। ज्ञानियांसि ॥ १३१ ॥
म्हणौनि अनित्याच्या ठायीं। तयां आस्तिक्यबुद्धि नाहीं। निष्कर्षु दोहींही। देखिला असे ॥ १३२ ॥

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥

देखें सारासार विचारितां। भ्रांति ते पाहीं असारता। तरी सार तें स्वभावता। नित्य जाणें ॥ १३३ ॥
हा लोकत्रयाकारु। तो जयाचा विस्तारु। तेथ नाम वर्ण आकारु। चिन्ह नाहीं ॥ १३४ ॥

जो सर्वदा सर्वगतु। जन्मक्षयातीतु। तया केलियाहि घातु। कदा नोहे ॥१३५॥

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥१८॥

आणि शरीरजात आघवें। हें नाशिवंत स्वभावें। म्हणौनि तुवां झुंजावें। पंडुकुमरा ॥१३६॥

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥१९॥

तूं धरूनि देहाभिमानातें। दिठी सूनि शरीरातें। मी मारिता हे मरते। म्हणतु आहासी ॥१३७॥
तरी अर्जुना तूं हें नेणसी। जरी तत्त्वता विचारिसी। तरी वधिता तूं नव्हेसी। हे वध्य नव्हती ॥१३८॥

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥२०॥
वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम् ॥२१॥

जैसें स्वप्नामाजीं देखिजे। तें स्वप्नींचि साच आपजे। मग चेऊनियां पाहिजे। तंव कांहीं नाहीं ॥१३९॥
तैसी हे जाण माया। तूं भ्रमतु आहासी वायां। शस्त्रें हाणितलिया छाया। जैसी आंगीं न रुपे ॥१४०॥
कां पूर्ण कुंभ उलंडला। तेथ बिंबाकारु दिसे भ्रंशला। परी भानु नाहीं नासला। तयासवें ॥१४१॥
ना तरी मठीं आकाश जैसें। मठाकृती अवतरलें असे। तो भंगलिया आपैसें। स्वरूपचि ॥१४२॥
तैसें शरीराच्या लोपीं। सर्वथा नाशु नाहीं स्वरूपीं। म्हणौनि तू हें नारोपी। भ्रांति बापा ॥१४३॥

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥२२॥

जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे। मग नूतन वेढिजे। तैसें देहांतरातें स्वीकारिजे। चैतन्यनाथें ॥१४४॥

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥२३॥
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥२४॥

हा अनादि नित्यसिद्धु। निरुपाधि विशुद्धु। म्हणौनि शस्त्रादिकीं छेदु। न घडे यया ॥१४५॥
हा प्रळयोदकें नाप्लवे। अग्निदाहो न संभवे। एथ महाशोषु न प्रभवे। मारुताचा ॥१४६॥

अर्जुना हा नित्यु। अचळु हा शाश्वतु। सर्वत्र सदोदितु। परिपूर्णु हा ॥१४७॥

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥२५॥

हा तर्काचिये दिठी। गोचर नोहे किरीटी। ध्यान याचिये भेटी। उत्कंठा वाहे ॥१४८॥
हा सदा दुर्लभु मना। आपु नोहे साधना। निःसीमु हा अर्जुना। पुरुषोत्तमु ॥१४९॥
हा गुणत्रयरहितु। अनादि अविकृतु। व्यक्तीसी अतीतु। सर्वरूप ॥१५०॥
अर्जुना ऐसा हा जाणावा। सकळात्मकु देखावा। मग सहजें शोकु आघवा। हरेल तुझा ॥१५१॥

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।
तथापि त्वं महाबाहो नैवं शौचितुमर्हसि ॥२६॥

अथवा ऐसा नेणसी। तूं अंतवंतचि मानिसी। तर्‍ही शोचूं न पवसी। पंडुकुमरा ॥१५२॥
जो आदि स्थिति अंतु। हा निरंतर असे नित्यु। जैसा प्रवाहो अनुस्यूतु। गंगाजळाचा ॥१५३॥
तें आदि नाहीं खंडलें। समुद्रीं तरी असे मीनलें। आणि जातचि मध्यें उरलें। दिसे जैसें ॥१५४॥
इयें तिन्ही तयापरी। सरसींच सदा अवधारीं। भूतांसी कवणीं अवसरीं। ठाकती ना ॥१५५॥
म्हणौनि हें आघवें। एथ तुज नलगे शोचावें। जे स्थितीचि हे स्वभावें। अनादि ऐसी ॥१५६॥
ना तरी हें अर्जुना। नयेचि तुझिया मना। जे देखोनि लोकु अधीना। जन्मक्षया ॥१५७॥
तरी एथ कांहीं। तुज शोकासि कारण नाहीं। हे जन्ममृत्यु पाहीं। अपरिहर ॥१५८॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥२७॥

उपजे तें नाशे। नाशलें पुनरपि दिसे। हें घटिकायंत्र जैसें। परिभ्रमे गा ॥१५९॥
ना तरी उदो अस्तु आपैसें। अखंडित होत जात जैसें। हें जन्ममरण तैसें। अनिवार जगीं ॥१६०॥
महाप्रळयअवसरें। हें त्रैलोक्यहि संहरे। म्हणौनि हा न परिहरे। आदि अंतु ॥१६१॥
तूं जरी हें ऐसें मानिसी। तरी खेदु कां करिसी ?। काय जाणतुचि नेणसी। धनुर्धरा ॥१६२॥
एथ आणीकही एक पार्था। तुज बहुतीं परी पहातां। दुःख करावया सर्वथा। विषो नाहीं ॥१६३॥

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥२८॥

जियें समस्तें इयें भूतें। जन्माआदि अमूर्तें। मग पातली व्यक्तीतें। जन्मलेया ॥१६४॥
तियें क्षयासि जेथ जाती। तेथ निभ्रांत आनें नव्हती। देखें पूर्वस्थितीच येती। आपुलिये ॥१६५॥
येर मध्यें जें प्रतिभासे। तें निद्रिता स्वप्न जैसें। तैसा आकारु हा मायवशें। तत्स्वरूपीं ॥१६६॥

ना तरी पवनें स्पर्शिलें नीर। पढियासे तरंगाकार। कां परापेक्षां अळंकार। व्यक्ती कनकीं ॥१६७॥
तैसे सकळ हें मूर्त। जाण पां मायाकारित। जैसें आकाशीं बिंबत। अभ्रपटल ॥१६८॥
तैसें आदीचि जें नाहीं। तयालागीं तूं रुदसी कायी। तूं अवीट तें पाहीं। चैतन्य एक ॥१६९॥
जयाचि आर्तीचि भोगित। विषयीं त्यजिले संत। जयालागीं विरक्त। वनवासिये ॥१७०॥
दिठी सूनि जयातें। ब्रह्मचर्यादि व्रतें। मुनीश्वर तपातें। आचरताती ॥१७१॥

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः श्रुणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥२९॥

एक अंतरीं निश्चळ। जें निहाळितां केवळ। विसरले सकळ। संसारजात ॥१७२॥
एकां गुणानुवादु करितां। उपरति होऊन चित्ता। निरवधि तल्लीनता। निरंतर ॥१७३॥
एक ऐकतांचि निवाले। ते देहभावी सांडिले। एक अनुभवें पातले। तद्रूपता ॥१७४॥
जैसे सरिता ओघ समस्त। समुद्रामाजीं मिळत। परी माघौते न समात। परतले नाहीं ॥१७५॥
तैसिया योगीश्वरांचिया मती। मिळवणीसवें एकवटती। परी जे विचारूनि पुनरावृत्ति। भजतीचिना ॥१७६॥

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥३०॥

जें सर्वत्र सर्वही देहीं। जया करितांही घातु नाहीं। तें विश्वात्मक तूं पाहीं। चैतन्य एक ॥१७७॥
जयाचेनि स्वभावें। हें होत जात आघवें। तरी सांग काय शोचावें। एथ तुवां ॥१७८॥
एऱ्हवीं तरी पार्था। तुज कां नेणों न मनें चित्ता। परी किडाळ हें शोचितां। बहुतीं परीं ॥१७९॥

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि ।
धर्माद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥३१॥

तूं अझुनी कां न विचारिसी। काय हें चिंतितु आहासी। स्वधर्मु तो विसरलासी। तरावें जेणें ॥१८०॥
या कौरवां भलतें जाहलें। अथवा तुजचि कांहीं पातलें। कीं युगचि हें बुडालें। जऱ्ही एथ ॥१८१॥
तरी स्वधर्मु एकु आहे। तो सर्वथा त्याज्य नोहे। मग तरिजेल काय पाहें। कृपाळूपणें ॥१८२॥
अर्जुना तुझें चित्त। जऱ्ही जाहलें द्रवीभूत। तऱ्ही हें अनुचित। संग्रामसमयीं ॥१८३॥
अगा गोक्षीर जरी जाहलें। तरी पथ्यासि नाहीं म्हणितलें। ऐसेनिहि विष होय सुदलें। नवज्वरीं देतां ॥१८४॥
तैसें आनी आन करितां। नाशु होईल हिता। म्हणौनि तूं आतां। सावध होई ॥१८५॥
वायांचि व्याकुळ कायी। आपुला निजधर्मु पाहीं। जो आचरितां बाधु नाहीं। कवणें काळीं ॥१८६॥
जैसें मार्गेंचि चालतां। अपावो न पवे सर्वथा। कां दीपाधारें वर्ततां। नाडळिजे ॥१८७॥
तयापरी पार्था। स्वधर्में राहाटतां। सकळ कामपूर्णता। सहजें होय ॥१८८॥
म्हणौनि यालागीं पाहीं। तुम्हां क्षत्रियां आणीक कांहीं। संग्रामावांचूनि नाहीं। उचित जाणें ॥१८९॥
निष्कपटा होआवें। उसिणा घाई झुंजावें। हें असो काय सांगावें। प्रत्यक्षावरी ॥१९०॥

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम् ॥ ३२॥

अर्जुना झुंज देखें आतांचें। हें हो कां जें दैव तुमचें। कीं निधान सकळ धर्माचें। प्रगटलें असे ॥ १९१॥
हा संग्रामु काय म्हणिपे। कीं स्वर्गुचि येणें रूपें। मूर्त कां प्रतापें। उदो केला ॥ १९२॥
ना तरी गुणाचेनि पतिकरें। आर्तीचेनि पडिभरें। हें कीर्तीचि स्वयंवरें। आली तुज ॥ १९३॥
क्षत्रियें बहुत पुण्य कीजे। तैं झुंज ऐसें लाहिजे। जैसें मार्गें जातां आडळिजे। चिंतामणि ॥ १९४॥
ना तरी जांभया पसरे मुख। तेथ अवचटें पडे पीयूख। तैसा संग्रामु हा देख। पातला असे ॥ १९५॥

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥ ३३॥

आतां हा ऐसा अव्हेरिजे। मग नाथिलें शोचूं बैसिजे। तरी आपण आहाणा होईजे। आपणपेयां ॥ १९६॥
पूर्वजांचें जोडलें। आपणचि होय धाडिलें। जरी आजि शस्त्र सांडिलें। रणीं इये ॥ १९७॥
असती कीर्ति जाईल। जगचि अभिशापु देईल। आणि गिंवसित पावतील। महादोष ॥ १९८॥
जैसीं भातारेंहीन वनिता। उपहती पावे सर्वथा। तैशी दशा जीविता। स्वधर्मेंवीण ॥ १९९॥
ना तरी रणीं शव सांडिजे। तें चौमेरी गिधीं विदारिजे। तैसें स्वधर्महीना अभिभविजे। महादोषीं ॥ २००॥

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् ।
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४॥

म्हणौनि स्वधर्मु हा सांडसील। पापा वरपडा होसील। आणि अपेश तें न वचेल। कल्पांतवरी ॥ २०१॥
जाणतेनि तंवचि जियावें। जंव अपकीर्ति आंगा न पवे। आणि सांग पां केवीं निगावें। एथोनियां ? ॥ २०२॥
तू निर्मत्सर सदयता। येथूनि निघसील कीर माघौता। परी ते गती समस्तां। न मनेल ययां ॥ २०३॥
हे चहूंकडूनि वेढितील। बाणवरी घेतील। तेथ पार्था न सुटिजेल। कृपाळुपणें ॥ २०४॥
ऐसेनिहि प्राणसंकटें। जरी विपायें पां निघणें घटे। तरी तें जियालेंही वोखटें। मरणाहुनी ॥ २०५॥

भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः ।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५॥

तूं आणिकही एक न विचारिसी। एथ संभ्रमें झुंजों आलासी। आणि सकणवपणें निघालासी। मागुता जरी ॥ २०६॥
तरी तुझें तें अर्जुना। या वैरियां दुर्जनां। कां प्रत्यया येईल मना। सांगैं मज ॥ २०७॥

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यन्ति तवाहिताः ।

निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६॥

हे म्हणती गेला रे गेला। अर्जुन आम्हां बिहाला। हा सांगैं बोलु उरला। निका कायी ? ॥ २०८॥
लोक सायासें करूनि बहुतें। कां वेंचिती आपुलीं जीवितें। परी वाढविती कीर्तीतें। धनुर्धरा ॥ २०९॥
ते तुज अनायासें। अनकळित जोडिली असे। हें अद्वितीय जैसें। गगन आहे ॥ २१०॥
तैसी कीर्ती निःसीम। तुझ्या ठायीं निरुपम। तुझे गुण उत्तम। तिहीं लोकीं ॥ २११॥
दिगंतीचे भूपति। भाट होऊनि वाखाणिती। जे ऐकिलिया दचकती। कृतांतादिक ॥ २१२॥
ऐसी महिमा घनवट। गंगा जैसी चोखट। जया देखीं जगीं सुभट। वाट जाहली ॥ २१३॥
तें पौरुष तुझें अद्भुत। आइकोनियां हे समस्त। जाहले आथि विरक्त। जीवितेंसी ॥ २१४॥
जैसा सिंहाचिया हाकां। युगांतु होय मदमुखा। तैसा कौरवां अशेखां। धाकु तुझा ॥ २१५॥
जैसे पर्वत वज्रातें। ना तरी सर्प गरुडातें। तैसे अर्जुना हे तूतें। मानिती सदा ॥ २१६॥
तें अगाधपण जाईल। मग हीणावो अंगा येईल। जरी मागुता निघसील। न झुंजतुचि ॥ २१७॥
आणि हे पळतां पळों नेदिती। धरूनिं अवकळा करिती। न गणित कुटी बोलती। आइकतां तुज ॥ २१८॥
मग ते वेळीं हियें फुटावें। आतां लाठेपणें कां न झुजावें ?। हे जिंतलें तरी भोगावें। महीतळ ॥ २१९॥

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ३७॥

ना तरी रणीं एथ। झुंजतां वेंचलें जीवित। तरी स्वर्गसुख अनकळित। पावसील ॥ २२०॥
म्हणौनि ये गोठी। विचारु न करी किरीटी। आतां धनुष्य घेऊनि उठीं। झुंजैं वेगीं ॥ २१॥
ना तरी रणीं एथ। झुंजतां वेंचलें जीवित। तरी स्वर्गसुख अनकळित। पावसील ॥ २२०॥
म्हणौनि ये गोठी। विचारु न करी किरीटी। आतां धनुष्य घेऊनि उठीं। झुंजैं वेगीं ॥ २२१॥
देखैं स्वधर्मु हा आचरतां। दोषु नाशे असता। तुज भ्रांति हे कवण चित्ता। पातकाची ॥ २२२॥
सांगैं प्लवेंचि काय बुडिजे। कां मार्गीं जातां आडळिजे। परी विपायें चालों नेणिजे। तरी तेंही घडे ॥ २२३॥
अमृतें तरीच मरिजे। जरी विखेंसि सेविजे। तैसा स्वधर्मीं दोषु पाविजे। हेतुकपणें ॥ २२४॥
म्हणौनियां पार्था। हेतू सांडोनि सर्वथा। तुज क्षात्रवृत्ति झुंजतां। पाप नाहीं ॥ २२५॥

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ३८॥

सुखीं संतोषां न यावें। दुःखीं विषादा न भजावें। आणि लाभालाभ न धरावे। मनामाजीं ॥ २२६॥
एथ विजयपण होईल। कीं सर्वथा देह जाईल। हें आधींचि कांही पुढील। चिंतावेना ॥ २२७॥
आपणयां उचिता। स्वधर्में राहाटतां। जें पावे तें निवांता। साहोनि जावें ॥ २२८॥
ऐसियां मनें होआवें। तरी दोषु न घडे स्वभावें। म्हणौनि आतां झुंजावें। निभ्रांत तुवां ॥ २२९॥

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां श्रृणु ।

बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि ॥ ३९ ॥

हे सांख्यस्थिति मुकुळित। सांगितली तुज येथ। आतां बुद्धियोगु निश्चित। अवधारीं पां ॥ २३० ॥
जया बुद्धियुक्ता। जाहलिया पार्था। कर्मबंधु सर्वथा। बाधूं न पवे ॥ २३१ ॥
जैसें वज्रकवच लेइजे। मग शस्त्रांचा वर्षावो साहिजे। परी जैतेसीं उरिजे। अचुंबित ॥ २३२ ॥

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥

तैसें ऐहिक तरी न नशे। आणि मोक्षु तो उरला असे। जेथ पूर्वानुक्रमु दिसे। चोखाळत ॥ २३३ ॥
कर्माधारें राहाटिजे। परी कर्मफळ न निरीक्षिजे। जैसा मंत्रज्ञु न बंधिजे। भूतबाधा ॥ २३४ ॥
तियापरी जे सुबुद्धि। आपुलालिया निरवधि। हा असतांचि उपाधि। आकळूं न सके ॥ २३५ ॥
जेथ न संचरे पुण्यपाप। जें सूक्ष्म अति निष्कंप। गुणत्रयादि लेप। न लगती जेथ ॥ २३६ ॥
अर्जुना तें पुण्यवशें। जरी अल्पचि हृदयीं बुद्धि प्रकाशे। तरी अशेषही नाशे। संसारभय ॥ २३७ ॥

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन ।
बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥

जैसी दीपकळिका धाकुटी। परी बहु तेजातें प्रकटी। तैसी सद्‌बुद्धी हे थेकुटी। म्हणों नये ॥ २३८ ॥
पार्था बहुतीं परी। हे अपेक्षिजे विचारशूरीं। जे दुर्लभ चराचरीं। सद्वासना ॥ २३९ ॥
आणिकासारिखा बहुवसु। जैसा न जोडे परिसु। कां अमृताचा लेशु। दैवगुणें ॥ २४० ॥
तैसी दुर्लभ जे सद्‌बुद्धि। जिये परमात्माचि अवधि। जैसा गंगेसी उदधि। निरंतर ॥ २४१ ॥
तैसें ईश्वरावाचुंनी कांहीं। जिये आणीक लाणी नाहीं। ते एकचि बुद्धि पाहीं। अर्जुना जगीं ॥ २४२ ॥
येर ते दुर्मति। जे बहुधा असे विकरति। तेथ निरंतर रमती। अविवेकिये ॥ २४३ ॥
म्हणौनि तयां पार्था। स्वर्ग संसार नरकावस्था। आत्मसुख सर्वथा। दृष्ट नाहीं ॥ २४४ ॥

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः ।
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥
कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥
भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥

वेदाधारें बोलती। केवळ कर्म प्रतिष्ठिती। परी कर्मफळीं आसक्ती। धरूनियां ॥ २४५ ॥
म्हणती संसारीं जन्मिजे। यज्ञादिक कर्म कीजे। मग स्वर्गसुख भोगिजे। मनोहर ॥ २४६ ॥
येथ हें वांचूनि कांहीं। आणिक सर्वथा सुखचि नाहीं। ऐसें अर्जुना बोलती पाहीं। दुर्बुद्धि ते ॥ २४७ ॥

देखैं कामना अभिभूत। होऊनि कर्मैं आचरत। ते केवळ भोगीं चित्त। देऊनियां ॥ २४८॥
क्रियाविशेषें बहुतें। न लोपिती विधीतें। निपुण होऊन धर्मातें। अनुष्ठिती ॥ २४९॥
परी एकचि कुडें करितीं। जे स्वर्गकामु मनीं धरिती। यज्ञपुरुषा चुकती। भोक्ता जो ॥ २५०॥
जैसा कर्पूराचा राशी कीजे। मग अग्नि लाऊन दीजे। कां मिष्टान्नीं संचरविजे। काळकूट ॥ २५१॥
दैवें अमृतकुंभ जोडला। तो पायें हाणोनि उलंडिला। तैसा नासिती धर्मु निपजला। हेतुकपणें ॥ २५२॥
सायासें पुण्य अर्जिजे। मग संसारु कां अपेक्षिजे ?। परी नेणती ते काय कीजे। अप्राप्य देखें ॥ २५३॥
जैसी रांधवणी रससोय निकी। करूनियां मोलें विकी। तैसा भोगासाठीं अविवेकी। धाडिती धर्मु ॥ २५४॥
म्हणोनि हे पार्था। दुर्बुद्धि देख सर्वथा। तया वेदवादरतां। मनीं वसे ॥ २५५॥

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५॥

तिन्हीं गुणीं आवृत। हे वेद जाणैं निभ्रांत। म्हणौनि उपनिषदादि समस्त। सात्विक तें ॥ २५६॥
येर रजतमात्मक। जेथ निरूपिजे कर्मादिक। जे केवळ स्वर्गसूचक। धनुर्धरा ॥ २५७॥
म्हणौनि तूं जाण। हे सुखदुःखांसीच कारण। एथ झणें अंतःकरण। रिगों देसी ॥ २५८॥
तूं गुणत्रयातें अव्हेरीं। मी माझें हें न करीं। एक आत्मसुख अंतरीं। विसंब झणीं ॥ २५९॥

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६॥

जरी वेदें बहुत बोलिलें। विविध भेद सूचिले। तऱ्ही आपण हित आपुलें। तेंचि घेपें ॥ २६०॥
जैसा प्रगटलिया गभस्ती। अशेषही मार्ग दिसती। तरी तेतुलेहि काय चालिजती। सांगैं मज ॥ २६१॥
कां उदकमय सकळ। जऱ्ही जाहले असें महीतळ। तरी आपण घेपें केवळ। आर्तीचिजोगें ॥ २६२॥
तैसें ज्ञानीये जे होती। ते वेदार्थातें विवरिती। मग अपेक्षित तें स्वीकारिती। शाश्वत जें ॥ २६३॥

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥ ४७॥

म्हणोनि आइकें पार्था। याचिपरी पाहतां। तुज उचित होय आतां। स्वकर्म हें ॥ २६४॥
आम्हीं समस्तही विचारिलें। तंव ऐसेचि हें मना आलें। जें न सांडिजे तुवां आपुलें। विहित कर्म ॥ २६५॥
परी कर्मफळीं आस न करावी। आणि कुकर्मीं संगति न व्हावी। हे सत्क्रियाचि आचरावी। हेतूविण ॥ २६६॥

योगस्थः कुरु कर्माणि सङ्गंत्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥ ४८॥

तूं योगयुक्त होऊनी। फळाचा संगु टाकुनी। मग अर्जुना चित्त देउनी। करीं कर्मैं ॥ २६७॥

परी आदरिलें कर्म दैवें। जरी समाप्तीतें पावे। तरी विशेषें तेथ तोषावें। हेंही नको ॥ २६८॥
कीं निमित्तें कोणें एकें। तें सिद्धी न वचतां ठाके। तरी तेथिंचेनि अपरितोखें। क्षोभावें ना ॥ २६९॥
आचरतां सिद्धी गेलें। तरी काजाची कीर आलें। परी ठेलियाही सगुण जहालें। ऐसेंचि मानीं ॥ २७०॥
देखैं जेतुलालें कर्म निपजे। तेतुलें आदिपुरुषीं अर्पिजे। तरी परिपूर्ण सहजें। जहालें जाणैं ॥ २७१॥
देखैं संतासंतकर्मीं। हें जें सरिसेंपण मनोधर्मीं। तेचि योगस्थिति उत्तमीं। प्रशंसिजे ॥ २७२॥

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ ४९॥
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥ ५०॥

अर्जुना समत्व चित्ताचें। तेंचि सार जाणैं योगाचें। जेथ मन आणि बुद्धीचें। ऐक्य आथी ॥ २७३॥
तो बुद्धियोग विवरितां। बहुतें पाडें पार्था। दिसे हा अरुता। कर्मभागु ॥ २७४॥
परी तेंचि कर्म आचरिजे। तरीच हा योगु पाविजे। जें कर्मशेष सहजें। योगस्थिति ॥ २७५॥
म्हणौनि बुद्धियोगु सधरु। तेथ अर्जुना होई स्थिरु। मनें करीं अव्हेरु। फलहेतूचा ॥ २७६॥
जे बुद्धियोगा योजिले। तेचि पारंगत जाहले। इहीं उभयबंधीं सांडिले। पापपुण्यीं ॥ २७७॥

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।
जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ॥ ५१॥

ते कर्मीं तरी वर्तती। परी कर्मफळा नातळती। आणि यातायाति न लोपती। अर्जुना तयां ॥ २७८॥
मग निरामयभरित। पावती पद अच्युत। ते बुद्धियोगयुक्त। धनुर्धरा ॥ २७९॥

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥ ५२॥

तूं ऐसा तैं होसी। जैं मोहातें यया सांडिसी। आणि वैराग्य मानसीं। संचरैल ॥ २८०॥
मग निष्कळंक गहन। उपजेल आत्मज्ञान। तेणें निचाडें होईल मन। अपैसें तुझें ॥ २८१॥
तेथ आणिक कांहीं जाणावें। कां मागिलातें स्मरावें। हें अर्जुना आघवें। पारुषेल ॥ २८२॥

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३॥

इंद्रियांचिया संगति। जिये पसरु होतसे मति। ते स्थिर होईल मागुती। आत्मस्वरूपीं ॥ २८३॥
समाधिसुखीं केवळ। जैं बुद्धि होईल निश्चळ। तैं पावसी तूं सकळ। योगस्थिति ॥ २८४॥

अर्जुन उवाच ।
स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ ५४ ॥

तेथ अर्जुन म्हणे देवा। हाचि अभिप्रावो आघवा। मी पुसेन आतां सांगावा। कृपानिधी ॥ २८५ ॥
मग अच्युत म्हणे सुखें। जें किरीटी तुज निकें। तें पूस पां उन्मेखें। मनाचेनि ॥ २८६ ॥
या बोला पार्थें। म्हणितलें सांग पां श्रीकृष्णातें। काय म्हणिपें स्थितप्रज्ञातें। वोळखों केवीं ॥ २८७ ॥
आणि स्थिरबुद्धि जो म्हणिजे। तो कैसिया चिन्हीं जाणिजे। जो समाधिसुख भुंजे। अखंडित ॥ २८८ ॥
तो कवणें स्थिती असे। कैसेनि रूपीं विलसे। देवा सांगावें हें ऐसें। लक्ष्मीपती ॥ २८९ ॥
तंव परब्रह्म अवतरणु। जो षडगुणाधिकरणु। तो काय तेथ नारायणु। बोलतु असे ॥ २९० ॥

श्रीभगवानुवाच ।
प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥

म्हणे अर्जुना परियेसीं। जो हा अभिलाषु प्रौढ मानसीं। तो अंतराय स्वसुखेंसीं। करीतु असे ॥ २९१ ॥
जो सर्वदा नित्यतृप्तु। अंतःकरण भरितु। परी विषयामाजीं पतितु। जेणें संगें कीजे ॥ २९२ ॥
तो कामु सर्वथा जाये। जयाचें आत्मतोषीं मन राहे। तोचि स्थितप्रज्ञु होये। पुरुष जाणें ॥ २९३ ॥

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥

नाना दुःखीं प्राप्तीं। जयासी उद्वेगु नाहीं चित्तीं। आणि सुखाचिया आर्तीं। अडपैजेना ॥ २९४ ॥
अर्जुना तयाच्या ठायीं। कामक्रोधु सहजें नाहीं। आणि भयातें नेणें कहीं। परिपूर्णु तो ॥ २९५ ॥
ऐसा जो निरवधि। तो जाण पां स्थिरबुद्धि। जो निरसूनि उपाधि। भेदरहितु ॥ २९६ ॥

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५७ ॥

जो सर्वत्र सदा सरिसा। परिपूर्णु चंद्रु कां जैसा। अधमोत्तम प्रकाशा-। माजीं न म्हणे ॥ २९७ ॥
ऐसी अनवच्छिन्न समता। भूतमात्रीं सदयता। आणि पालटु नाहीं चित्ता। कवणें वेळे ॥ २९८ ॥
गोमटें कांहीं पावे। तरी संतोषें तेणें नाभिभवे। जो वोखटेनि नागवे। विषादासी ॥ २९९ ॥
ऐसा हरिखशोकरहितु। जो आत्मबोधभरितु। तो जाण पां प्रज्ञायुक्तु। धनुर्धरा ॥ ३०० ॥

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।

इंद्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥५८॥

कां कूर्म जियापरी। उवाइला अवेव पसरी। ना तरी इच्छावशें आवरी। आपुले आपण ॥३०१॥
तैसीं इंद्रियें आपैतीं होतीं। जयाचें म्हणितलें करिती। तयाची प्रज्ञा जाण स्थिति। पातली असे ॥३०२॥

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥५९॥

अर्जुना आणिकही एक। सांगेन ऐकें कवतिक। या विषयांतें साधक। त्यजिती नियमें ॥३०३॥
श्रोत्रादि इंद्रियें आवरिती। परि रसने नियमु न करिती। ते सहस्त्रधा कवळिजती। विषयीं इहीं ॥३०४॥
जैसी वरिवरि पालवी खुडिजे। आणि मुळीं उदक घालिजे। तरी कैसेनि नाशु निपजे। तया वृक्षा ॥३०५॥
तो उदकाचेनि बळें अधिकें। जैसा आडवेनि आंगें फांके। तैसा मानसीं विषो पोखे। रसनाद्वारें ॥३०६॥
येरां इंद्रियां विषय तुटे। तैसा नियमूं न ये रस हटें। जे जीवन हें न घटे। येणेंविण ॥३०७॥
मग अर्जुना स्वभावें। ऐसियाही नियमातें पावे। जैं परब्रह्म अनुभवें। होऊनि जाइजे ॥३०८॥
तैं शरीरभाव नासती। इंद्रियें विषय विसरती। जैं सोहंभाव प्रतीति। प्रगट होय ॥३०९॥

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः ।
इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥६०॥

येऱ्हवीं तरी अर्जुना। हें आया नये साधना। जे राहटताती जतना। निरंतर ॥३१०॥
जयातें अभ्यासाची घरटी। यमनियमांची ताटी। जे मनातें सदा मुठी। धरूनि आहाती ॥३११॥
तेही किजती कासाविसी। या इंद्रियांची प्रौढी ऐसी। जैसी मंत्रज्ञातें विवसी। भुलवी कां ॥३१२॥
देखैं विषय हे तैसे। पावती ऋद्धिसिद्धिचेनि मिषें। मग आकळिती स्पर्शें। इंद्रियांचेनि ॥३१३॥
तिये संधीं मन जाये। मग अभ्यासीं ठोठावलें ठाये। ऐसें बळकटपण आहे। इंद्रियांचें ॥३१४॥

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।
वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥६१॥

म्हणौनि आइकें पार्था। यांतें निर्दळी जो सर्वथा। सर्व विषयीं आस्था। सांडूनियां ॥३१५॥
तोचि तूं जाण। योगनिष्ठेसी कारण। जयाचे विषयसुखें अंतःकरण। झकवेना ॥३१६॥
जो आत्मबोधयुक्तु। होऊनि असे सततु। जो मातें हृदयाआंतु। विसंबेना ॥३१७॥
येऱ्हवीं बाह्य विषय तरी नाहीं। परी मानसीं होईल जरी कांहीं। तरी साद्यंतुचि पाहीं। संसारु असे ॥३१८॥
जैसा कां विषाचा लेशु। घेतलियां होय बहुवसु। मग निभ्रांत करी नाशु। जीवितासी ॥३१९॥
तैसी विषयाची शंका। मनीं वसती देखा। घातु करी अशेखा। विवेकजाता ॥३२०॥

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते ।

सङ्गात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३॥

जरी हृदयीं विषय स्मरती। तरी निसंगाही आपजे संगती। संगें प्रगटे मूर्ति। अभिलाषाची ॥ ३२१॥
जेथ कामु उपजला। तेथ क्रोधु आधींचि आला। क्रोधीं असे ठेविला। संमोह जाणें ॥ ३२२॥
संमोहा जालिया व्यक्ति। तरी नाशु पावे स्मृति। चडवातें ज्योति। आहत जैसी ॥ ३२३॥
कां अस्तमानीं निशी। जैसी सूर्य तेजातें ग्रासी। तैसी दशा स्मृतिभ्रंशीं। प्राणियांसी ॥ ३२४॥
मग अज्ञानांध केवळ। तेणें आप्लविजे सकळ। तेथ बुद्धि होय व्याकुळ। हृदयामाजीं ॥ ३२५॥
जैसें जात्यंधा पळणीं पावे। मग ते काकुळती सैरा धांवे। तैसें बुद्धीसि होती भंवे। धनुर्धरा ॥ ३२६॥
ऐसा स्मृतिभ्रंशु घडे। मग सर्वथा बुद्धि अवघडे। तेथ समूळ हें उपडे। ज्ञानजात ॥ ३२७॥
चैतन्याच्या भ्रंशीं। शरीरा दशा जैशी। तैसें पुरुषा बुद्धिनाशीं। होय देखैं ॥ ३२८॥
म्हणौनि आइकें अर्जुना। जैसा विस्फुलिंग लागे इंधना। मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना। पुरों शके ॥ ३२९॥
तैसें विषयांचें ध्यान। जरी विपायें वाहे मन। तरी येसणें हें पतन। गिंवसित पावे ॥ ३३०॥

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४॥

म्हणौनि विषय हे आघवे। सर्वथा मनौनि सांडावे। मग रागद्वेष स्वभावें। नाशतील ॥ ३३१॥
पार्था आणिकही एक। जरी नाशले रागद्वेष। तरी इंद्रियां विषयीं बाधक। रमतां नाहीं ॥ ३३२॥
जैसा सूर्य आकाशगतु। रश्मिकरें जगातें स्पर्शतु। तरी संगदोषें काय लिंपतु। तेथिचेनि ॥ ३३३॥
तैसा इंद्रियार्थीं उदासीन। आत्मरसेंचि निर्भिन्न। जो कामक्रोधविहीन। होऊनि असे ॥ ३३४॥
तरी विषयां तयां कांहीं। आपणपेंवांचूनि नाहीं। मग विषय कवण कायी। बाधितील कवणा ॥ ३३५॥
जरी उदकीं उदक बुडिजे। कां अग्नि आगी पोळिजे। तरी विषयसंगे आप्लविजे। परिपूर्णु तो ॥ ३३६॥
ऐसा आपणचि केवळु। होऊनि असे निखळु। तयाचि प्रज्ञा अचळु। निभ्रांत मानीं ॥ ३३७॥

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ६५॥

देखैं अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथ रिगणें नाहीं समस्तां। संसारदुःखां ॥ ३३८॥
जैसा अमृताचा निर्झरु। प्रसवे जयाचा जठरु। तया क्षुधेतृषेचा अडदरु। कहींचि नाहीं ॥ ३३९॥
तैसें हृदय प्रसन्न होये। तरी दुःख कैचें कें आहे ?। तेथ आपैसी बुद्धि राहे। परमात्मरूपीं ॥ ३४०॥
जैसा निर्वातीचा दीपु। सर्वथा नेणें कंपु। तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरूपु। योगयुक्तु ॥ ३४१॥

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।

न चाभावयतः शांतिरशान्तस्य कुतः सुखम् ॥ ६६॥

ये युक्तीची कडसणी। नाहीं जयाच्या अंतःकरणीं। तो आकळिला जाण गुणीं। विषयादिकीं ॥ ३४२॥
तया स्थिरबुद्धि पार्था। कहीं नाहीं सर्वथा। आणि स्थैर्याची आस्था। तेही नुपजे ॥ ३४३॥
निश्चळत्वाची भावना। जरी नव्हेचि देखैं मना। तरी शांति केवीं अर्जुना। आपु होय ॥ ३४४॥
जेथ शांतीचा जिव्हाळा नाहीं। तेथ सुख विसरोनि न रिगे कहीं। जैसा पापियाच्या ठायीं। मोक्षु न वसे ॥ ३४५॥
देखैं अग्निमाजीं घापती। तियें बीजें जरी विरूढती। तरी अशांता सुखप्राप्ती। घडों शके ॥ ३४६॥
म्हणौनि अयुक्तपण मनाचें। तेंचि सर्वस्व दुःखाचें। या कारणें इंद्रियांचें। दमन निकें ॥ ३४७॥

इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनु विधीयते ।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि ॥ ६७॥

इंद्रियें जें जें म्हणती। तें तेंचि जे पुरुष करिती। ते तरलेचि न तरती। विषयसिंधु ॥ ३४८॥
जैसी नाव थडिये ठाकितां। जरी वरपडी होय दुर्वाता। तरी चुकलाही मागौता। अपावो पावे ॥ ३४९॥
तैसीं प्राप्तेंही पुरुषें। इंद्रियें लाळिलीं जरी कौतुकें। तरी आक्रमिला जाण दुःखें। संसारिकें ॥ ३५०॥

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।
इंद्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८॥

म्हणौनि आपुलीं आपणपेया। जरी इंद्रियें येती आया। तरी अधिक कांहीं धनंजया। सार्थक असे ? ॥ ३५१॥
देखैं कूर्म जियापरी। उवाइला अवेव पसरी। ना तरी इच्छावशें आवरी। आपणपेंचि ॥ ३५२॥
तैसीं इंद्रियें आपैतीं होती। जयाचें म्हणितलें करिती। तयाची प्रज्ञा जाण स्थिती। पातली असे ॥ ३५३॥
आतां आणिक एक गहन। पूर्णाचें चिन्ह। अर्जुना तुज सांगैन। परिस पां ॥ ३५४॥

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९॥

देखैं भूतजात निदेलें। तेथेंचि जया पाहलें। आणि जीव जेथ चेइलें। तेथ निद्रितु जो ॥ ३५५॥
तोचि तो निरुपाधि। अर्जुना तो स्थिरबुद्धि। तोचि जाणें निरवधि। मुनीश्वर ॥ ३५६॥

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ॥ ७०॥

पार्था आणीकही परी। तो जाणों येईल अवधारीं। जैसी अक्षोभता सागरीं। अखंडित ॥ ३५७॥
जऱ्ही सरितावोघ समस्त। परिपूर्ण होऊनि मिळत। तऱ्ही अधिक नोहे ईषत्। मर्यादा न संडी ॥ ३५८॥
ना तरी ग्रीष्मकाळीं सरिता। शोषूनि जाती समस्ता। परी न्यून नव्हे पार्था। समुद्र जैसा ॥ ३५९॥

तैसा प्राप्तीं ऋद्धिसिद्धीं। तयासि क्षोभु नाहीं बुद्धी। आणि न पवतां न बाधी। अधृति तयातें ॥ ३६०॥
सांगैं सूर्याच्या घरीं। प्रकाशु काय वातीवेरी। कां न लविजे तरी अंधारीं। कोंडेल तो ॥ ३६१॥
देखैं ऋद्धिसिद्धि तयापरी। आली गेली से न करी। तो विगुंतला असे अंतरीं। महासुखीं ॥ ३६२॥
जो आपुलेनि नागरपणें। इंद्रभुवनातें पाबळें म्हणे। तो केवीं रंजे पालिवणें। भिल्लांचेनि ? ॥ ३६३॥
जो अमृतासी ठी ठेवी। तो जैसा कांजी न सेवी। तैसा स्वसुखानुभवी। न भोगी ऋद्धि ॥ ३६४॥
पार्था नवल हें पाहीं। जेथ स्वर्गसुख लेखनीय नाहीं। तेथ ऋद्धिसिद्धी कायी। प्राकृता होती ॥ ३६५॥

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥ ७१॥

ऐसा आत्मबोधें तोषला। जो परमानंदें पोखला। तोचि स्थिरप्रज्ञु भला। वोळख तूं ॥ ३६६॥
तो अहंकारातें दंडुनी। सकळ कामु सांडोनी। विचरे विश्व होऊनी। विश्वामाजीं ॥ ३६७॥

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ ७२॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगोनाम द्वितीयोऽध्यायः ॥ २अ ॥

हे ब्रह्मस्थिति निःसीम। जे अनुभवितां निष्काम। ते पावले परब्रह्म। अनायासें ॥ ३६८॥
जे चिद्रूपीं मिळतां। देहांतीचि व्याकुळता। आड ठाकों न सके चित्ता। प्राज्ञा जया ॥ ३६९॥
तेचि हे स्थिति। स्वमुखें श्रीपति। सांगत अर्जुनाप्रति। संजयो म्हणे ॥ ३७०॥
ऐसें कृष्णवाक्य ऐकिलें। तेथ अर्जुनें मनीं म्हणितलें। आतां आमुचियाचि काजा कीर आलें। उपपत्ति इया ॥ ३७१॥
जें कर्मजात आघवें। एथ निराकारिलें देवें। तरी पारुषलें म्यां झुंजावें। म्हणौनियां ॥ ३७२॥
ऐसा श्रीअच्युताचिया बोला। चित्तीं धनुर्धरु उवाइला। आतां प्रश्नु करील भला। आशंकोनी ॥ ३७३॥
तो प्रसंगु असे नागरु। जो सकळ धर्मासी आगरु। कीं विवेकामृतसागरु। प्रांतहीनु ॥ ३७४॥
जो आपण सर्वज्ञनाथु। निरूपिता होईल श्रीअनंतु। ज्ञानदेवो सांगेल मातु। निवृत्तिदासु ॥ ३७५॥
इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां द्वितीयोऽध्यायः ॥

Encoded and proofread by
Chhaya Deo, Sharad Deo, and Vishwas Bhide.
Assisted by
Sunder Hattangadi, Joshi, and Shree Devi Kumar.

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated November 23, 2008